


PATODA SANCHAR

# पाटोदा संचार

संस्थापक संपादक- स्व.विश्वकर्मा डोळसे
संपादक-विलास डोळसे
E-mail-pat.sanchar@gmail.com

❑पाटोदा/बीड ❑स्थापना वर्ष ३५ वे, वर्ष २१ वे ❑अंक ९ वा ❑ शुक्रवार दि.६ फेब्रुवारी २०२६ ❑ पाने-४ किंमत १ रुपया ❑पो.र.नं.एल/एसबी/बीड/रनंप-२२१/२०२५-२७❑R.N.I. No.MAHMAR/46359

❑PATODA/BEED ❑YEAR 21 th ❑Issu - 9 ❑ Wednesday 6 Friday 2026 ❑ Page- 4 Price- Rs.1.❑ Post.Reg.No.L/SB/Beed/RNP-221/ 2025-27 ❑R.N.I. No.MAHMAR/46359


# शासकीय रुग्णालयातील मोफत उपचार थांबणार!

## रुग्णांना मोजावे लागणार सुविधेनुसार पैसे; अंमलबजावणी लवकरच

पुणे । प्रतिनिधी

राज्यातील जिल्हा सामान्य रुग्णालय तसेच जिल्ह्यातील इतर शासकीय रुग्णालयांत रुग्णांना मिळणारी मोफत उपचार सुविधा ही बंद होणार असून, रुग्णांना आता आरोग्य सुविधेसाठी पैसे मोजावे लागणार आहेत. यासंदर्भातील शासन निर्णयदेखील १६ जानेवारी रोजी सार्वजनिक आरोग्य विभागाने जारी केला आहे. त्यामुळे रुग्णालय प्रशासनाला मार्गदर्शक सूचना प्राप्त होताच त्याच्या अंमलबजावणीला सुरुवात होणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

राज्य शासनाने १५ ऑगस्ट २०२३ पासून राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयांतील उपचार सुविधा ही मोफत केली होती. त्यामुळे जिल्हा सामान्य रुग्णालय, जिल्हा स्त्री विभागीय रुग्णालय, संदर्भसेवा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालयात




उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना सर्वच प्रकारची आरोग्य सेवा ही मोफत मिळत होती. याकरिता कोणत्याही प्रकारचे शुल्क हे रुग्णांना आकारण्यात येत नव्हते. त्यामुळे शासकीय रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याचे चित्र पाहायला मिळत होते.

अशातच आता शासनाने अडीच वर्षांतच आपला निर्णय पुन्हा बदलला आहे. १६ जानेवारी रोजी सार्वजनिक आरोग्य विभागाने सुधारित व अद्ययावत अशी 'नागरिकांची सनद' प्रसिद्ध केली आहे. यानुसार रुग्णांना आता शासकीय रुग्णालयात मोफत सुविधा मिळणार

पान दोन वर

### काही घटकांना मोफत उपचार मिळण्याचा हक्क

जीआरमध्ये असे नमूद केले आहे की समाजातील काही घटकांना मोफत उपचार मिळण्याचा हक्क आहे आणि ते त्याचा लाभ घेत राहतील. त्यात सरकारी कर्मचारी आणि त्यांचे आश्रित, सरकारी रुग्णालये आणि दवाखान्यांचे वैद्यकीय अधिकारी आणि नर्सिंग कर्मचारी, वैद्यकीय, पॅरामेडिकल, ऑक्युपेशनल थेरपी आणि फिजिओथेरपी महाविद्यालयात शिकणारे विद्यार्थी, न्यायालयाच्या आदेशानुसार ताब्यात घेतलेले लोक, स्वातंत्र्यसैनिक आणि त्यांचे कुटुंबीय, वैद्यकीय-कायदेशीर प्रकरणांमध्ये वैद्यकीय उपचारासाठी पाठवलेले लोक आणि पोलिसांकडून योग्य खटल्यांमध्ये रेफर केलेले रुग्ण, न्यायालयीन सुविधेखालील कैदी यांचा समावेश होता. कुष्ठरोग मंडळ, आश्रमशाळा आणि महिला सुधारक सुविधांद्वारे, शहरी भागातील निराधार मुले, आमदार, खासदार, मंत्री, वक्ते, विधानसभेचे माजी सदस्य/विधान परिषद आणि न्यायाधीश.

### सर्वांसाठी आरोग्य पूर्णपणे मोफत असले पाहिजे

दरम्यान, आरोग्य कार्यकर्ते शरद शेट्टी म्हणाले, हे शुल्क बघता बघता नाममात्र वाटू शकते. मात्र, जे लोक सरकारी हॉस्पिटलमध्ये जातात ते एकतर हतबल असतात आणि त्यांना उपचारांची गरज असते किंवा ते समाजातील सर्वात खालच्या स्तरातील असतात. अनेकदा त्यांच्यासाठी उपचारापेक्षा एक दिवसाची मजुरी महत्त्वाची असते. अशा मोफत उपचारांसाठी सरकारकडून पैसे आकारणे मोठा अडथळा ठरेल, जे आमदार आणि न्यायमूर्ती कधीही सरकारी रुग्णालयात उपचारासाठी येत नाहीत. निर्णयाचे पुन्हा विश्लेषण केले पाहिजे. सरकारी रुग्णालयांमध्ये सर्वांसाठी आरोग्य पूर्णपणे मोफत असले पाहिजे.

तथापि, सिव्हिल सर्जन अद्याप जीआर नियमांची अंमलबजावणी सुरू करू शकले नाहीत. ठाणे जिल्ह्यातील सिव्हिल सर्जन डॉ. कैलास पवार म्हणाले, आम्ही संभ्रमात आहोत. सरकारने २०२३ मध्ये एक जीआर जारी केला होता की सर्व सेवा - पीपीपी तत्त्वावर पुरविल्या जाणाऱ्या सेवा पूर्णपणे मोफत असतील, असे नमूद केले होते. मला आणखी स्पष्टीकरण हवे आहे. मागील जीआर देखील याच सरकारने जारी केला होता, त्यामुळे काही गोंधळ आहे.

छत्रपती संभाजीनगर येथील सिव्हिल सर्जन डॉ.कमलाकर मुदखेडकर म्हणाले, आम्ही दोन दिवसांपूर्वीच प्राप्त झालेल्या जीआरच्या नियमांची अंमलबजावणी करणे बाकी आहे.

# पाटोदा पंचायत समितीमध्ये 'घरकुल'साठी पैशाची मागणी; संतप्त लाभार्थ्यांनी कर्मचाऱ्यांना झापले

पाटोदा । प्रतिनिधी

गोरगरिबांचे हक्काचे घर साकारण्यासाठी असलेल्या 'पंतप्रधान' आवास योजनेला भ्रष्टाचाराची वाळवी लागल्याचे चित्र पाटोदा पंचायत समितीमध्ये पाहायला मिळत आहे. घरकुल योजनेचा पुढील हप्ता सोडण्यासाठी कर्मचाऱ्यांकडून उघडपणे पैशांची मागणी केली जात असल्याचा आरोप करत, आज संतप्त लाभार्थ्यांनी संबंधित कर्मचाऱ्यांना कार्यालयातच चांगलेच धारेवर धरले. यामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

*गोरगरिबांच्या हक्काच्या पैशात वाटा मागणं लाजीरवाणं आहे. जर ही अडवणूक थांबली नाही, तर आम्ही वरिष्ठ पातळीवर तक्रार करू आणि लोकशाही मार्गाने आंदोलन छेडू.*
*- संतप्त लाभार्थी*

मिळालेल्या माहितीनुसार, तालुक्यातील अनेक लाभार्थी गेल्या काही दिवसांपासून घरकुलाच्या हप्त्यासाठी पंचायत समितीच्या चकरा मारत आहेत. घरकुलाचे काम विहित टप्प्यात पूर्ण होऊनही केवळ 'फाईल पुढे सरकवण्यासाठी' काही कर्मचाऱ्यांकडून ठराविक रकमेची मागणी केली जात असल्याची तक्रार लाभार्थ्यांनी केली आहे. पैसे दिले तरच हप्ता जमा होईल, अन्यथा टाळाटाळ केली जाईल, अशा शब्दांत कर्मचाऱ्यांनी अडवणूक केल्याचा आरोप लाभार्थ्यांनी केला.

**कार्यालयातच संताप व्यक्त**

वारंवार विनंती करूनही काम होत नसल्याने आणि उघडपणे लाच मागितली जात असल्याने लाभार्थ्यांचा संयम सुटला. आज काही लाभार्थ्यांनी थेट संबंधित

पान दोन वर

# बीड जिल्ह्यातील ३ दिव्यांग शाळांची मान्यता रद्द होणार; सचिव तुकाराम मुंढे यांच्या आदेशानंतर धडक कारवाई

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याशी खेळणाऱ्या संस्थांविरुद्ध प्रशासनाने आता कडक पाऊले उचलण्यास सुरुवात केली आहे. राज्याचे दिव्यांग कल्याण सचिव मा. तुकाराम मुंढे यांच्या आदेशानुसार जिल्ह्यात दिव्यांग शाळांची अचानक तपासणी मोहीम राबवण्यात येत असून, यामध्ये गंभीर त्रुटी आढळलेल्या ३ शाळांची मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव आयुक्तांकडे पाठवण्यात आला आहे.

जिल्ह्यात अंध, मूकबधिर, मतिमंद आणि अस्थिव्यंग प्रवर्गातील एकूण ४८ शाळा कार्यरत आहेत. यापैकी पहिल्या टप्प्यात ६ शाळांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये खालील शाळा दोषी आढळल्या आहेत. १. अस्थिव्यंग शाळा, तळेगाव, २. मतिमंद शाळा, बीड, ३. मूकबधिर शाळा, तांबराजुरी या शाळांमध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती अत्यंत नगण्य असणे आणि भौतिक सुविधांचा अभाव असणे या बाबी समोर आल्या आहेत. त्यामुळे या शाळांची मान्यता रद्द करून तेथील अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्याचा प्रस्ताव आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांच्याकडे सादर करण्यात आला आहे.

**२० फेब्रुवारीपर्यंत सर्व शाळांची चौकशी**

जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी श्रीमती प्रियाराणी पाटील यांनी ही मोहीम अधिक तीव्र करण्याचे संकेत दिले आहेत. त्यांनी स्पष्ट केले की, येत्या २० फेब्रुवारी २०२६ पर्यंत जिल्ह्यातील १०० टक्के शाळांची सखोल चौकशी पूर्ण केली जाईल. UDISE Plus मधील नोंदीनुसार विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष पडताळणी केली जात असून, कोणत्याही संस्थेच्या दबावाला न जुमानता वस्तुनिष्ठ अहवाल सादर केला जाईल.

**वेतन आणि वेतनेतर अनुदानावर गदा**

ज्या शाळांमध्ये गैरप्रकार किंवा त्रुटी आढळतील, त्यांचे वेतनेतर अनुदान तत्काळ बंद करण्यात येईल आणि त्यांची अनुद्याप्ती रद्द करण्याचा प्रस्ताव वरिष्ठांकडे पाठवला जाईल. दिव्यांग विद्यार्थ्यांना निवास, भोजन आणि दर्जेदार शिक्षण देणे ही संबंधित संस्थेची जबाबदारी आहे, त्यासाठी शासन स्तरावरून अनुदान दिले जाते. मात्र, या सुविधा कागदावरच असल्याचे आढळल्यास गय केली जाणार नाही.

दिव्यांग कल्याण विभाग हा नव्याने स्थापन झाला असून, या विभागामार्फत पारदर्शक आणि प्रभावी कामकाज व्हावे, अशी जनभावना आहे. त्यादृष्टीने बीड जिल्ह्यातील ही कारवाई अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

# २५ कोटींच्या अतिवृष्टी अनुदान घोटाळ्यातील मोठा मासा अखेर जाळ्यात, महसूल अधिकाऱ्याला बेड्या

जालना । प्रतिनिधी

शेतकऱ्यांच्या हक्काच्या पैशावर डल्ला मारणाऱ्या जालन्यातील अतिवृष्टी अनुदान घोटाळ्यात अखेर पोलिसांना मोठे यश आले आहे. जालन्याच्या आर्थिक गुन्हे शाखेने धडक कारवाई करत या घोटाळ्याचा मुख्य सूत्रधार आशिष प्रमोदकुमार पैठणकर याला बेड्या ठोकल्या आहेत. धक्कादायक म्हणजे, पैठणकर हा घनसावंगी तहसील कार्यालयात 'सहाय्यक महसूल अधिकारी' म्हणून कार्यरत आहे. कुंपणानेच शेत खाल्ल्याचा हा प्रकार समोर आल्याने जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.

दरम्यान, अतिवृष्टी अनुदानाच्या नावाखाली तब्बल २४ कोटी ९० लाख ७७ हजार ८११ रुपयांचा डल्ला मारणाऱ्या तब्बल ३१ सरकारी बाबूंना पोलिसांनी दोन दिवसांपूर्वी बेड्या ठोकल्या होत्या. आरोपींमध्ये २२ तलाठी, ५ महसूल अधिकारी आणि जिल्हाधिकारी कार्यालयातील एका अधिकाऱ्याचा समावेश आहे.

मिळालेली माहिती अशी, की जालन्यातील अतिवृष्टी अनुदान घोटाळ्यातील मुख्य सूत्रधाराला पोलिसांनी अटक केली आहे.

पान दोन वर

# मांजरसुंबा घाटात बर्निंग कारचा थरार; चालकाने प्रसंगावधान दाखविल्याने अनर्थ टळला

**बीड । प्रतिनिधी**

कारमधील इंजिन व इतर यंत्रणा गरम झाल्याने वायरचे शॉर्टसर्किट होऊन कारने अचानक पेट घेतला. चालकाने प्रसंगावधान दाखविले आणि पोलिसांनीही सतर्कता दाखविल्याने अनर्थ टळला. ही घटना मंगळवारी (ता. तीन) रात्री उशिरा मांजरसुंबा घाटात घडली. कारमधून चौघे प्रवास करत होते.

धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर मांजरसुंबा घाटातून गंगाखेडकडे जाणाऱ्या कारला (एमएच-२२, एएम-५२०३) शॉर्टसर्किटने रात्रीच्या वेळी आग लागली. या आगीने रौद्ररूप धारण केल्याने अनेकांचा थरकाप उडाला.

याचवेळी महामार्ग वाहतूक पोलिसांनी कारमधील हितेश खंडागळे, त्यांची पत्नी व दोन मुलांना कारमधून बाहेर काढले.

पान दोन वर

# बालविवाह रोखला; नवरदेवासह ५०-६० वऱ्हाड्यांवर गुन्हे दाखल

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील कपिलधार देवस्थान येथे होणारा एक बालविवाह रोखण्यात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या सतर्कतेमुळे यश आले आहे. या कारवाईत पोलिसांनी १६ वर्षीय पीडित मुलीची सुटका केली असून, नवरदेवासह त्याचे नातेवाईक आणि उपस्थित ५० ते ६० वऱ्हाड्यांविरुद्ध बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



दिनांक ५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११:३० च्या सुमारास सामाजिक कार्यकर्ते तत्वशील कांबळे यांनी 'एएचटीयू' पथकाच्या प्रभारी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक पल्लवी जाधव यांना फोनवरून माहिती दिली की, कपिलधार देवस्थान येथे दुपारी १२ वाजता एक बालविवाह होणार आहे. माहिती मिळताच जाधव यांनी आपल्या पथकासह तातडीने घटनास्थळ गाठले.

कपिलधार देवस्थान येथे लग्नाची मोठी गर्दी होती. पोलिसांनी एका हॉलमध्ये जाऊन चौकशी केली असता, तेथील एका महिलेने मुलीचे नाव चुकीचे सांगून पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. मात्र, संशय आल्याने पोलिसांनी पुन्हा मुलीचे आडनाव विचारले असता सत्य समोर आले. पोलीस आल्याचे समजताच वऱ्हाडी मंडळींची पळापळ सुरू झाली. याच गर्दीचा फायदा घेऊन नवरदेव राजेंद्र भाऊसाहेब शिंदे (वय २४, रा. पिंपळाची वाडी, ता. शिरूर कासार) हा घटनास्थळावरून फरार झाला.

अशा गोंधळाच्या परिस्थितीतही पीएसआय पल्लवी जाधव यांनी पीडित मुलीला सुरक्षितपणे ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांनी उपस्थित नागरिकांना बालविवाह प्रतिबंधक कायद्याबाबत मार्गदर्शन करून जनजागृती केली.

पीडित मुलीच्या चौकशीनंतर, बालविवाह प्रतिबंधात्मक अधिकारी श्रीराम वीर यांना पाचारण करण्यात आले. त्यांच्या फिर्यादीवरून बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर ४३/२०२६, कलम ९, १०, ११ (बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६) अन्वये ८ मुख्य आरोपींसह ५० ते ६० वऱ्हाडी आणि देवस्थान ट्रस्टच्या सदस्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुलीच्या संरक्षणासाठी तिला बालकल्याण समितीसमोर हजर करण्याच्या सूचना तपास अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय पल्लवी जाधव, पोलीस हवालदार उषा चौरे, आणि पोलीस शिपाई अक्षय जाधव यांनी पार पाडली.

# शेतकरी व पशुपालकांना केंद्रबिंदू ठेवून प्रदर्शनाची तयारी करा-पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे

### परळीतील महापशुधन एक्स्पोच्या तयारीचा आढावा

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील शेतकरी व पशुपालकांना केंद्रबिंदू ठेवून बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथे १३ ते १५ फेब्रुवारी या कालावधीत 'महापशुधन एक्स्पो' हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. त्या दृष्टिने प्रदर्शनाच्या आयोजनाची तयारी करावी, असे निर्देश पर्यावरण व वातावरणीय बदल आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिले.

बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथे १३ ते १५ फेब्रुवारी या कालावधीत 'महापशुधन एक्स्पो' प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाच्या तयारीचा पशुसंवर्धन मंत्री श्रीमती मुंडे यांनी आढावा घेतला. यावेळी पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन., पशुसंवर्धन आयुक्त डॉ. प्रविणकुमार देवरे, बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासह राज्यातील पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.



पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, सशक्त पशुधन हा उद्देश ठेवून या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात यावे. राज्यातील शेतकरी व पशुपालकांना नवनवीन पशुधनाची, त्यांच्या निगराणीविषयक तसेच या क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती व्हावी, यासाठी महापशुधन एक्स्पो महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळे शेतकरी व पशुपालकांच्या दृष्टिकोनातून प्रदर्शनाच्या आयोजनाची तयारी करावी. हे प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी पशुसंवर्धन व जिल्हा प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी समन्वयाने कामे करावीत. या प्रदर्शनात जैविक शेती, पशुधनापासून होणारे लाभ याविषयी माहिती शेतकऱ्यांना मिळावी, यासाठी चर्चासत्रे आयोजित करण्यात यावीत.

पशुप्रदर्शनात १५०० पशु

पान दोन वर

संपादकीय...

# ऑनलाइन नोटीस

राज्यात महसूल विभागाच्या कामकाजात महत्त्वाचा बदल करण्यात आला असून सातबारा नोटीस, फेरफार प्रकरणांतील न्यायालयीन नोटीस तसेच महाराष्ट्र महसूल संहितेअंतर्गत अपिलांच्या नोटिसा आता तलाठ्यांकडून थेट पोस्ट ऑफिसला ऑनलाइन पद्धतीने पाठवण्यात येणार आहेत. पोस्ट ऑफिसमार्फत या नोटिसा संबंधित पक्षकारांना रजिस्टर पोस्टाने बजावल्या जाणार असल्याने नोटीस पोहोचण्याबाबतची खात्री वाढणार आहे. आतापर्यंत ऑफलाइन पद्धतीत नोटीस बजावण्यावरून अनेकदा तक्रारी होत होत्या. नोटीस दिली तरी ती मिळाली नाही, वेळेत पोहोचली नाही किंवा नोंद राहिली नाही, अशा प्रकारचे वाद निर्माण होत होते. तलाठ्यांवर मोठ्या प्रमाणात कामाचा भार असल्याने सर्व नोटिसा वेळेत देणे कठीण जात होते. यावर उपाय म्हणून भूमी अभिलेख विभागाने ऑनलाइन प्रणालीचा पर्याय सुरू केला आहे.

गावपातळीवर महसूल विभागाचा प्रमुख प्रतिनिधी म्हणून तलाठी विविध प्रकरणांत नोटिसा काढतो. खरेदी-विक्री व्यवहार, वारस नोंद, फेरफार, न्यायालयीन प्रकरणे, अपील आदी अनेक बाबींमध्ये संबंधितांना नोटीस देणे आवश्यक असते. या सर्व प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी आणि कामकाज सुलभ करण्यासाठी ही नवीन पद्धत राबवली जात आहे.

सातबारा नोटीस, उताऱ्यातील फेरफारच्या न्यायालयीन प्रकरणांमधील नोटीस तसेच महाराष्ट्र महसूलसंहितेतील अपिलांमधील नोटिस आता तलाठ्यांकडून पोस्ट ऑफिसमध्ये ऑनलाइन देण्यात येणार आहेत. पोस्ट ऑफिसमधून या नोटीस थेट पक्षकारांना बजावल्या जाणार आहेत. त्यामुळे तलाठ्यांचे काम सुकर होऊन पक्षकारांनाही या नोटीसा बजाविल्या जाणार याची खात्री करता येणार आहे. ऑफलाइन प्रकारात अनेकदा तलाठी आणि पक्षकारांकडून नोटीस बजावणे आणि त्या न मिळणे अशा स्वरूपाच्या तक्रारी येत होत्या. त्यावर भूमी अभिलेख विभागाने हा उपाय काढला आहे. पुढील दोन महिन्यात राज्यभरात हा उपक्रम सर्वच गावांमध्ये सुरू करण्याचा निर्णय विभागाने घेतला आहे.

गावपातळीवर महसूल विभागाचा प्रतिनिधी म्हणून तलाठी काम करत असतो. नागरिकांपर्यंत माहिती पोचविण्यासाठी तलाठी वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये नोटिसा काढत असतो. त्यात खरेदी विक्री झाल्यानंतर संबंधितांना त्यांच्याशी संबंधित असणाऱ्यांना नोटीसा बजावल्या जातात. वारस नोंदी घेताना देखील अशा स्वरूपाच्या संबंधितांना नोटीसा बजावल्या जातात, त्याचप्रमाणे न्यायालयीन नोटीसा, अपिलाच्या नोटीसह फेरफार या नोटिसादेखील तलाठ्याकडून बजावल्या जातात. याची संख्या मोठी असल्याने तलाठ्यांवर कामाचा मोठा भार असतो.

अनेकदा संबंधित पक्षकारांना नोटीस बजावूनही त्या मिळत नाहीत, कार्यालयीन कामकाजाच्या भारामुळे देखील तलाठ्याकडून वेळेत नोटीस देणे होत नाही. यावर उपाय म्हणून भूमी अभिलेख विभागाने आता या नोटिसा ऑनलाईन पद्धतीने बजावण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार आता तलाठ्याकडे आलेली नोटीस ऑनलाइन पद्धतीने पोस्ट ऑफिसामध्ये दिली जाणार आहे. पोस्ट ऑफिस ही नोटीस प्रिंट करून, ती संबंधित पक्षकाराला रजिस्टर पोस्टाने पाठविणार आहे. संबंधित पक्षकाराला नोटीस बजावण्यात आल्याचे नोटिफिकेशन तलाठ्याकडे जाणार आहे. या नोटीसा तलाठ्यांकडे आल्यानंतर त्यात आहेत. पोस्ट ऑफिसच प्रिट करून त्यावर योग्य तो ते तिकीट लावून पक्षकाराकडे पाठवणार. त्याचे ट्रॅक रेकॉर्ड ठेवले जाणार असून ते तलाठी पाहू शकणार आहे. या सर्व नोटिसांचे ट्रॅक रेकॉर्ड जिल्हाधिकाऱ्यांपर्यंत सर्व अधिकाऱ्यांना पाहता येणार आहे.

या उपक्रमाची प्रायोगिक अंमलबजावणी पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील वाऊंड आणि साते या गावांत करण्यात आली आहे. चाचणी यशस्वी ठरल्याने पुढील दोन महिन्यांत राज्यातील सर्व गावांमध्ये ही ऑनलाइन नोटीस प्रणाली सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# 'व्हॅलेंटाईन वीक' - युवावर्गाचे नैतिक अध:पतन करणारा सप्ताह

'प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं.. तुमचं आणि आमचं अगदी सेम असतं !' असे मंगेश पाडगावकरांनी कवितेतून सांगितले असले तरी हल्लीच्या प्रेमात सुद्धा बरेच प्रकार तयार झाले आहेत. सकाम आणि निष्काम प्रेम हे त्यातील मुख्य प्रकार. आपल्यावर प्रेम आहे म्हणणारी व्यक्ती आपल्यावर निष्काम प्रेम करते कि त्यामागे तिचा काही हेतू दडला आहे हे ओळखणे आजच्या काळात अत्यावश्यक बनले आहे. प्रेमातील फसवणुकीची प्रकरणेही हल्ली वाढली आहेत. यामध्ये बऱ्याचदा बळी जातो तो मुलीचा. प्रेमात फसवणूक झाल्याने दरवर्षी कितीतरी मुलींचे आयुष्य उध्वस्त होते, तर कितीतरी जणी निराश होऊन मृत्यूला कवटाळतात. मुलींचे मनच मुळात भावनाशील असल्याने प्रेमात अशाप्रकारे वर्गवारी करणे प्रत्येकीला जमतेच असे नाही. मुलींच्या याच कमजोरीचा गैरफायदा घेणारे, तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिची फसवणूक करणारे, तिच्या भावनांशी खेळणारे राक्षसीप्रवृत्तीची माणसे आज चोहोबाजूंनी पसरलेली आहेत, त्यामुळे आता मुलींना प्रेमात आंधळे होणे परवडणारे नाही.

काहीजण म्हणतील प्रेम केले जात नाही, तर ते आपसूकच होते. असे असेल, तर दरवर्षी ७ ते १४ फेब्रुवारी या सात दिवसांत तरुणवर्गामध्ये उत्साहाने साजरा केला जाणारा 'व्हॅलेंटाईन वीक'चा उहापोह कशासाठी ? हा सप्ताह नेमका प्रेमाचा असतो कि स्वैराचाराचा ? 'व्हॅलेंटाईन वीक'च्या स्वागतासाठी भेटवस्तूंची दुकाने मागील तीन-चार दिवसांपासून सजली आहेत, वृत्तवाहिन्यांतून सौंदर्य तज्ज्ञांना निमंत्रित करून 'व्हॅलेंटाईन वीक'साठी मुलींनी कशा प्रकारे तयारी




करावी याबाबतच्या 'टिप्स' दिल्या जात आहेत. 'कॉलेज कॅम्पस'मध्ये सुद्धा सध्या याच विषयाची चर्चा रंगलेली दिसून येते. इंग्रजांच्या गुलामगिरीतून देशाला स्वातंत्र्य मिळून ७८ वर्षे उलटली. मात्र त्यांच्या वैचारिक आणि सांस्कृतिक गुलामगिरीच्या जोखडातून आपण अद्याप मुक्त झालो नसल्याचा प्रत्यय दर वर्षी 'व्हॅलेंटाईन वीक' सुरु झाला कि येऊ लागतो. 'व्हॅलेंटाईन डे'ची 'क्रेझ' जेव्हढी भारतात पाहायला मिळते तेव्हढी अन्य पाश्चिमात्य देशांमध्ये खचितच असावी. ७ फेब्रुवारीपासून १४ फेब्रुवारीपर्यंत विविध 'डेज'



सौ. मोक्षदा घाणेकर,
काळाचौकी, मुंबई

भारतासारख्या संस्कृतीप्रिय राष्ट्रात तरुण तरुणींकडून उत्साहाने साजरे केले जातात.शहरातील ही 'क्रेझ' हळूहळू ग्रामीण भागातही पसरू लागली आहे. मातृभाषेला डावलून इंग्रजी आणि कॉन्व्हेंट शाळांमध्ये मुलांना घालण्याकडे पालकांचा वाढत चाललेला कल हेच यामागील प्रमुख कारण असावे.

या दिवसांत अनेक शाळा आणि महाविद्यालयांच्या आवारात शैक्षणिक वातावरण बिघडवणाऱ्या घडामोडी घडत असतात. परीक्षेच्या तयारीच्या दिवसांत काही चंगळवादी युवक युवतींची भलतीच तयारी सुरु असते. ज्याचा परिणाम शाळा महाविद्यालयांतील अन्य विद्यार्थीवर्गावर होत असतो. अनेक ठिकाणी शाळा-महाविद्यालय प्रशासनही या गोष्टींकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करते याचे खरेतर नवल वाटते. या दिवसांत 'डेज'च्या निमित्ताने पालकांच्या पैशांची तरुणांकडून मोठ्या प्रमाणात उधळपट्टी केली जाते. या ७ दिवसांमध्ये गर्भनिरोधक साधनांचा खपही वाढत असल्याचे एका सर्वेक्षणातून पुढे आले आहे. असल्या विदेशी भोगवादी दिवसांच्या मौजमजेमध्ये काडीमात्र रुची नसणाऱ्या अनेक मुलींना या 'डेज'चा कमालीचा मनस्ताप होतो. 'रोज डे', 'प्रपोझ डे', 'प्रॉमिस डे', 'किस डे', 'हग डे', 'चॉकोलेट डे' आणि 'व्हॅलेंटाईन डे' यांसारख्या डेजच्या निमित्ताने किशोरवयीन मुलींवर घातला जाणारा दबाव त्यांच्या मानसिक आरोग्यावर घातक परिणाम करतो. कितीतरी मुली या दिवसांत वासनांधांच्या खोट्या प्रेमाला भुलतात आणि आपल्या आयुष्याची राखरांगोळी करतात. लव्ह जिहादची प्रकरणे देशाच्या कानाकोपऱ्यातून वाढू लागली आहेत. अशांसाठी हे डेज म्हणजे 'इप्सित साध्य करण्यासाठी मिळालेली पर्वणीच असते. प्रेमाला भारतीय संस्कृतीने नेहमीच पवित्र आणि उच्च स्थान दिले आहे; मात्र प्रेमाच्या नावाखाली घातला जाणारा बाजार आणि चालणारा स्वैराचार आपल्या संस्कृतीला नक्कीच शोभणारा नाही. भारतीय संस्कृतीवर आघात करणारा आणि युवावर्गाचे नैतिक अध:पतन करणारा 'व्हॅलेंटाईन वीक' आपल्या देशात हवा तरी कशाला?

# संसदेत विरोधी पक्षाला बोलू दिले जात नाही, माईक बंद केले जातात; सभागृहातील गोंधळावरुन वर्षा गायकवाड संतापल्या

नवी दिल्ली । वृत्तसेवा

लोकसभेतील कामकाज बंद पाडण्यात सत्ताधारी पक्षच आघाडीवर आहे. विरोधी पक्षाला बोलू दिले जात नाही, त्यांचे माईक बंद केले जातात. सत्ताधाऱ्यांसाठी वेगळे नियम आणि विरोधकांसाठी वेगळे नियम आहेत असे चित्र आहे.

विरोधी पक्षनेते राहुल गांधी बोलत असताना लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला सातत्याने बोलण्यापासून रोखत होते, त्यांचा माईक बंद करत होते. पण भाजपा खासदार निशिकांत दुबे बोलताना त्यांना रोखले नाही. दुबेनी शिष्टाचाराच्या सर्व मर्यादा ओलांडल्या असतानाही, लोकसभा अध्यक्षांनी त्यांना थांबवले नाही. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांचे हे वर्तन पक्षपाती असून लोकशाहीची हत्या करणारे आहे, असा आरोप काँग्रेस खासदार वर्षा गायकवाड यांनी केला आहे.

संसदेतील कामकाजावर प्रसार माध्यमांशी बोलताना खासदार वर्षा गायकवाड म्हणाल्या



की, भाजपाचा मुजोर खासदार निशिकांत दुबेने पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु तसेच इंदिरा गांधींबद्दल अत्यंत आक्षेपार्ह भाषा वापरली परंतु लोकसभा अध्यक्षांनी त्यांच्यावर कोणतीही कारवाई केली नाही. मी आणि माझ्या काही सहकारी महिला खासदारांनी निशिकांत दुबेला जाब विचारण्याचा प्रयत्न केला असता आमच्या प्रश्नांची उत्तरे देण्याऐवजी दुबे धूम ठोकून पळाला. जेव्हा संसदेच्या प्रतिष्ठेचा आणि महिलांच्या सन्मानाचा प्रश्न येतो, तेव्हा नियम सर्वांसाठी समान असले पाहिजेत. पंडित नेहरु व इंदिरा गांधी यांच्याबद्दल निशिकांत दुबेने जी भाषा वापरली त्याबद्दल त्याला निलंबित केले पाहिजे, अशी मागणी खासदार वर्षा गायकवाड यांनी केली आहे.

संसदेत विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्ष दोन्ही समान व तेवढेच महत्त्वाचे आहेत. परंतु गेल्या तीन-चार दिवसांपासून एक खेळ पद्धतशिरपणे खेळला जात आहे. जेव्हा भाजपा खासदार निशिकांत दुबे बोलायला उभे राहतात, तेव्हा त्यांचा मायक्रोफोन नेहमी चालू असतो पण जेव्हा विरोधक बोलतात, तेव्हा त्यांचे मायक्रोफोन वारंवार बंद केले जातात. आम्ही हा मुद्दा उपस्थित केला आणि सांगितले की हे योग्य नाही, आणि कारवाई केली पाहिजे. जेव्हा त्यांना बोलायची परवानगी देण्यात आली, तेव्हा त्यांनी नकार दिला. मग ते तिथे कसे उभे राहिले? त्यांचा मायक्रोफोन अजूनही चालू कसा होता? आम्हाला ४ वाजता भेटण्याची वेळ दिली, आम्ही दुपारी ४ वाजता पोहोचलो, पण काहीच तोडगा निघाला नाही. मग सायंकाळी ५ वाजेपर्यंत तोडगा काढला जाईल असे सांगितले पण काहीच झाले नाही. काँग्रेस नेत्यांबद्दल जर कोणी अपशब्द वापरला तर तो आम्ही खपवून घेणार नाही, असा इशाराही खासदार वर्षा गायकवाड यांनी दिला.

# बुडीत पतसंस्था मल्टीस्टेट ठेवीदारांचा २४ फेब्रुवारीला मुंबईत मोर्चा

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील बुडीत निघालेल्या ज्ञानराधा, साईराम, राजस्थानी, माँसाहेब जिजाऊ, सह इतर पतसंस्था व मल्टिस्टेटमधील ठेवी तात्काळ परत मिळाव्यात, जप्त केलेल्या मालमत्तांचा लिलाव करण्यात यावा, या प्रमुख मागण्यांसाठी ठेवीदार आता थेट रस्त्यावर उतरण्याच्या तयारीत आहेत.

या पार्श्वभूमीवर परळी व माजलगाव येथे ठेवीदारांच्या बैठका घेण्यात आल्या. मुंबईत होणाऱ्या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचा ठाम निर्धार यावेळी ठेवीदारांनी व्यक्त केला असल्याचे ठेवीदार कृती समितीचे मुख्य प्रवर्तक यांनी सांगितले.

२४ फेब्रुवारी रोजी मुंबई येथे ठेवीदारांचा भव्य मोर्चा काढण्यात येणार असून या मोर्चाच्या नियोजनासाठी तसेच ठेवीदारांमध्ये जागृती करण्यासाठी मराठवाड्यात शाखानिहाय बैठका घेतल्या जात आहेत. परळी व माजलगाव येथील बैठकीत ठेवीदार कृती समितीचे मुख्य प्रवर्तक तथा स्वाभिमानी संघटनेचे जिल्हाध्यक्ष यांनी मार्गदर्शन केले.

बुडीत पतसंस्था व मल्टिस्टेटमधील ठेवीदारांचे पैसे तात्काळ मिळावेत, जप्त मालमत्तांचा लिलाव लवकरात लवकर करून ठेवीदारांना न्याय द्यावा, अशी ठाम भूमिका मांडली. प्रशासनाने दिरंगाई केल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. बैठकीत ठेवीदारांनी एकजुटीने मुंबई मोर्चाला पाठिंबा देत आंदोलनात सक्रिय सहभाग घेण्याचा निर्धार व्यक्त केला.

## पान एक वरुन

### शासकीय रुग्णालयातील मोफत उपचार

नसल्याचे स्पष्ट झाले आहे. आवश्यक उपचार सुविधेनुसार शासनाने ठरवलेले शुल्क भरावे लागणार आहे.

जीआरनुसार, रूग्ण विभागातील रूग्णांना प्रवेशासाठी प्रतिदिन १० रुपये द्यावे लागतील. हिमोग्लोबिन, टीएलसी, डीएलसी, रक्तगट आणि आरएच चाचणी, मूत्र रासायनिक चाचण्या, कल्चर सेन्सिटिव्हिटी इत्यादीसाठी रक्त तपासणीसाठी प्रत्येकी १५ रुपये खर्च येईल. किडनी, मूत्राशय इत्यादींचे मूल्यांकन करण्यासाठी इंट्राव्हेनस पायलोग्राम प्रति एक्स-रे स्कॅनसाठी १०० रुपये खर्च येईल. डोक्याच्या सीटी स्कॅनसाठी ३०० रुपये, तर पाठीचा कणा, मान आणि छातीच्या सीटी स्कॅनसाठी ४०० रुपये लागतील. ऍनेस्थेसिया अंतर्गत मोठ्या आणि लहान शस्त्रक्रियांसाठी रुपये ६० ते १६० रुपये खर्च येईल. एमआरआय स्कॅनची किंमत १,६०० रुपये होती.गरोदर महिलेची पहिली प्रसूती मोफत असेल, तर दुसरी प्रसूतीसाठी ५० रुपये आणि तिसरी आणि त्यानंतर प्रत्येक वेळी २५० रुपये लागतील, असेही जीआरमध्ये नमूद करण्यात आले आहे.

सरकारी नर्सिंग होममध्ये एसी रूमची किंमत दररोज १५० रुपये असेल, तर नॉन-एसी रूमची किंमत दररोज ७५ रुपये असेल. आयसीयू शुल्क प्रतिदिन १०० रुपये आणि एकल हेमोडायलिसिससाठी रुपये १५० असा शिफारस करण्यात आला होता.

जीआरमध्ये विविध प्रमाणपत्रांसाठी दरही नमूद केले आहेत. खाजगी संस्थांना दिल्या जाणाऱ्या एम्बाल्म बॉडीसाठी १,५०० रुपये खर्च येईल. राज्य आपल्या रुग्णवाहिका सेवेसाठी प्रति किमी रुपये ५ आणि प्रति तास ३० रुपये आठ तासांपेक्षा जास्त प्रतीक्षा शुल्क म्हणून आकारेल. जीआर अंतर्गत सर्वात जास्त शुल्क संयुक्त बदलीसाठी रु. ४०,००० आहे. जीआरमध्ये म्हणाले की, कोणत्याही रुग्णाच्या उपचारास उशीर होऊ नये आणि रुग्णांना उपचार देणाऱ्या डॉक्टरांची नावे स्पष्टपणे प्रदर्शित केली जावीत.

### पाटोदा पंचायत समितीमध्ये 'घरकुल'साठी

कक्षात जाऊन कर्मचाऱ्यांना जाब विचारला. आम्ही गरिबांनी पैसे आणायचे कुठून? सरकार पैसे देते तर तुम्ही का अडवता? अशा शब्दांत लाभार्थ्यांनी कर्मचाऱ्यांना झापले. यावेळी कर्मचाऱ्यांची बोलती बंद झाली होती.

**भ्रष्टाचाराचा विळखा**

पाटोदा पंचायत समितीमध्ये घरकुल योजनेच्या हप्त्यासाठी ठराविक टक्केवारी ठरलेली असल्याची चर्चा आता उघडपणे तालुक्यात होत आहे. हप्ते वेळेवर न मिळाल्याने अनेकांच्या घरांची कामे अर्धवट अवस्थेत पडली असून, पावसामुळे साहित्याचे नुकसान होत असल्याचे लाभार्थ्यांनी सांगितले.

### २५ कोटींच्या अतिवृष्टी अनुदान

जालन्याच्या आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने ही मोठी कारवाई केली आहे. आशिष प्रमोदकुमार पैठणकर (वय ४५ वर्ष) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. आरोपी हा जालना जिल्ह्यातील घनसावंगी तहसील कार्यालयात सहाय्यक महसूल अधिकारी पदावर कार्यरत आहे.

जालना जिल्ह्यातील अंबड आणि घनसावंगी तालुक्यात २४ कोटी ९० लाख ७७ हजार ८११ रुपयांचा अतिवृष्टी अनुदान घोटाळा उघडकीस आल्यानंतर आरोपी फरार झाला होता. मागील पाच महिन्यांपासून तो पोलिसांना गुंगारा देत फरार होता. आरोपी वेळोवेळी आपले मोबाईल फोन व राहण्याची ठिकाणे बदलत होता. जेणेकरून पोलिसांना त्याचे लोकेशन मिळू नये. तसेच अटकपूर्व जामीन मिळवण्यासाठी तो प्रयत्न देखील करत होता. पोलिसांपासून लपण्यासाठी तो वेगवेगळ्या धार्मिक स्थळांवर वास्तव्य करत असल्याची माहिती आहे.

दरम्यान, आरोपी जालना येथे येणार असल्याची गुप्त माहिती आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली. तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपीचे लोकेशन निश्चित करत आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने त्याला अटक केली. या अतिवृष्टी अनुदान घोटाळा प्रकरणात आतापर्यंत जालन्याच्या आर्थिक गुन्हे शाखेने एकूण ३२ आरोपींना अटक केली असून, पुढील तपास सुरू असल्याची माहिती जालन्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक (आर्थिक गुन्हे शाखा) मिथुन घुगे यांनी दिली आहे.

### मांजरसुंबा घाटात बर्निंग कारचा

त्यानंतर नागरिकांच्या मदतीने कार विझविण्यात आली. नंतर ही कार रोडच्या बाजूला घेऊन वाहतूक सुरळीत करण्यात आली.

दरम्यान, या कारची नोंदणी नोव्हेंबर २०२९ मध्ये परभणी जिल्ह्यात झालेली असून, या कारचा फिटनेस २०३४ पर्यंतचा आहे. मात्र, मागच्या वर्षी नोव्हेंबर महिन्यातच या कारचा इन्शुरन्स संपला आहे. कारची पीयूसी २०२६ पर्यंतची असल्याची माहिती समोर आली.

### शेतकरी व पशुपालकांना केंद्रबिंदू

प्रदर्शीत करण्यात येणार आहेत. त्याशिवाय राज्य शासनाच्या कृषी, महिला व बालविकास यासह विविध विभागांचे माहितीपर स्टॉल असणार आहेत. तसेच बचतगटांचे स्टॉलही या ठिकाणी उभारण्यात येणार आहेत. प्रदर्शनास भेट देणाऱ्यांची संख्याही मोठी असल्याने या सर्वांची कोणतीही गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी. प्रदर्शनाचा परिसर स्वच्छ व सुरक्षित ठेवण्यात यावा. महिलांसाठी वेगळा कक्ष उभारून त्या ठिकाणी आवश्यक सुविधा व सुरक्षितता उपलब्ध असावी. प्रदर्शनात सहभागी होणाऱ्या पशुंच्या संरक्षणासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत. त्याशिवाय वैद्यकीय सुविधा कक्ष, रुग्णावाहिका, अग्निशमन यंत्रणा, पोलिस संरक्षण, स्वयंसेवक यांचीही नियुक्त करण्यात यावी, अशे निर्देश मंत्री पंकजा मुंडे यांनी यावेळी दिले.

या प्रदर्शनात विविध जातींच्या पशुंचा समावेश असणार आहेत. त्यांच्यासाठी विशेष व्यवस्था, डॉग शोसह विविध प्राण्यांसाठी ४० प्रकारच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. या स्पर्धांचे योग्य मूल्यांकन करण्यात येऊन विजेत्यांना पारितोषिके देण्यात येणार आहेत. राज्यातील पशुंशिवाय परराज्यातील गुणवंत व दर्जेदार पशुपक्षी यांचेही प्रदर्शन होईल. याचे नियोजन करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. प्रदर्शनाच्या ठिकाणी रक्तदान शिबिर, अवयवदान संमती पत्र आदी सामाजिक उपक्रमही राबविण्यात येणार आहेत.

महिला व विद्यार्थ्यांना पशुप्रदर्शन पाहण्यासाठी दुपारच्या वेळी विशेष वेळ ठेवण्यात यावा. तसेच राज्यातील पशुवैद्यकीय क्षेत्रातील विद्यार्थी, शेतकरी यांनाही निमंत्रित करण्यात यावे. राज्यातील विशेषतः मराठवाड्यातील लोकप्रतिनिधींनाही निमंत्रित करण्यात यावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

या प्रदर्शनास राज्यातील शेतकरी, पशुपालक, पशुवैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ, विद्यार्थी यांनीही उपस्थित रहावे, असे आवाहन पशुसंवर्धन मंत्री मुंडे यांनी यावेळी केले.

पशुसंवर्धन आयुक्त देवरे यांनी प्रदर्शनाच्या तयारीची माहिती दिली. प्रदर्शनास येणाऱ्यांसाठी पार्किंगची व्यवस्था करण्यात आली असून पशुधन घेऊन येणाऱ्या वाहनांसाठीही वेगळी व्यवस्था करण्यात आली आहे. मुख्य सभास्थानी वीस हजार आसनक्षमता असणार आहे. त्याशिवाय पारितोषिक पात्र पशुधनांचे विशेष प्रदर्शन या ठिकाणी असणार आहे. तीन वेगवेगळ्या पेंडॉलमध्ये सुमारे ३०० स्टॉलची व्यवस्था करण्यात आली आहे. या प्रदर्शनात पशुपालकांसमवेतच या क्षेत्रातील उद्योजकही सहभागी होणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

जिल्हाधिकारी जॉन्सन यांनीही प्रशासनाच्या वतीने करण्यात आलेल्या तयारीची माहिती दिली. प्रदर्शनात येणाऱ्या नागरिकांसाठी पहिल्या टप्प्यात वीस एसटी बसची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच गर्दी नियंत्रण, आपत्ती व्यवस्थापन आदींची तयारी करण्यात आली आहे. स्वयंसेवक म्हणून 'एनसीसी'च्या विद्यार्थ्यांचे सहाय्य घेण्यात येणार आहे. प्रदर्शनात महिला व विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा यासाठी नियोजन करण्यात आले आहे. तसेच पोलीसांचे हेल्प डेस्क उभारण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

# ‘खरा प्रियकर कधीच ब्लॅकमेल करत नाही’: ‘खासगी’ क्षण चित्रित करणाऱ्याला हायकोर्टाचा दणका; जामीन अर्ज फेटाळला!

- कनिष्ठ न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळल्यानंतर आरोप फरार झाला
- अटकपूर्व जामीनासाठी कर्नाटक उच्च न्यायालयात धाव
- जो व्यक्ती कायद्याचे पालन करत नाही त्याला विशेष सवलत (अटकपूर्व जामीन) देता येणार नाही : उच्च न्यायालय



बंगळूरु । वृत्तसेवा

कोणताही खरा प्रियकर आपल्या जोडीदाराबरोबरचे खासगी क्षणांचे फोटो काढून त्याला ब्लॅकमेल करून शारीरिक संबंधांसाठी जबरदस्ती करणार नाही, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत कर्नाटक उच्च न्यायालयाने एका महिलेवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप असलेल्या तरुणाचा अटकपूर्व जामीन नाकारल.

**खासगी क्षणाचे चित्रीकरण करुन पीडितेला ब्लॅकमेल**

आरोपीने पीडितेशी जवळीक निर्माण करून तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले. यावेळी त्याने पीडितेचे काही खासगी फोटो आणि व्हिडिओ चित्रीत केले होते.यानंतर या अश्लील फोटो आणि व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत वारंवार शारीरिक संबंधांसाठी ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली. ११ मार्च २०२५ रोजी आरोपीकडून होत असलेल्या अत्याचाराची माहिती पीडितेने कुटुबीयांना दिली. भारतीय न्याय संहिता (बीएनएस), २०२३ च्या संबंधित कलमांखाली आणि माहिती तंत्रज्ञान (आयटी) कायद्याच्या कलम ६७(ए) (इलेक्ट्रॉनिक स्वरूपात अश्लील सामग्री प्रकाशित करणे किंवा प्रसारित करण्याबद्दल शिक्षा) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

आरोपी फरार, अटकपूर्व जामीनासाठी हायकोर्टात अर्ज

या प्रकरणी पोलिसांनी तपास करून आरोपपत्र दाखल केले आणि आरोपीला फरार घोषित केले. त्यानंतर आरोपीने अटकपूर्व जामीन मिळवण्यासाठी आदेश मिळवण्याचा प्रयत्न केला, परंतु तो सत्र न्यायालयाने नाकारला. यानंतर आरोपीने अटकपूर्व जामीन मिळविण्यासाठी कर्नाटक उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

**'संबंधित घटना परस्पर संमतीने घडली असे गृहीत धरले, तरी...'**

न्यायमूर्ती व्ही. श्रीशानंदा यांनी या प्रकरणाची सुनावणी करताना स्पष्ट केले की, हे अगदी स्पष्ट आहे की, तरुण आणि तरुणीमध्ये जवळीक निर्माण झाली होती. याचिकाकर्त्याने प्रेमसंबंधाच्या नावाखाली पीडितेला शारीरिक संबंध ठेवण्यासाठी प्रवृत्त केले. आरोपीने पीडितेच्या जिव्हाळ्याच्या क्षणांचे फोटो काढले. यानंतर धमकी देवून लौंगिक संबंध ठेवण्यास जबरदस्ती केली. अशा प्रकरणात परस्पर संमती मानली, तरी कोणताही खरा प्रेमी आपल्या जोडीदाराचे खासगी क्षण कॅमेऱ्यात कैद करून त्याचा वापर लैंगिक शोषणासाठी किंवा धमकावण्यासाठी करणार नाही.

**'जोडीदाराला ब्लॅकमेल करणे संमतीचे कृत्य मानले जाऊ शकत नाही'**

प्रेमसंबंधाच्या नावाखाली शारीरिक संबंधांसाठी जोडीदाराला ब्लॅकमेल करणे हे कोणत्याही परिस्थितीत संमतीचे कृत्य मानले जाऊ शकत नाही. पोलीस तपासात आरोपी अद्याप फरार असल्याचे समोर आले आहे. जो व्यक्ती कायद्याला सहकार्य करत नाही, त्याला 'कायद्याचे पालन करणारा नागरिक' मानून विशेष सवलत (अटकपूर्व जामीन) देता येणार नाही. प्राथमिक तपासात आरोपीविरुद्ध पुरेसे पुरावे उपलब्ध असून, त्याने पीडितेचे मानसिक आणि शारीरिक शोषण केल्याचे स्पष्ट होत आहे, असे स्पष्ट करत उच्च न्यायालयाने आरोपीस कोणताही दिलास देण्यास नकार देत त्याचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला.

# ’थकले आणि निघून गेले’ –विरोधकांनी सभात्याग केल्यानंतर पंतप्रधान मोदींचा टोला

नवी दिल्ली । वृत्तसेवा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी राज्यसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावाला उत्तर दिलं. यावेळी विरोधी पक्षाच्या सदस्यांनी तीव्र गोंधळ आणि घोषणाबाजी करत सभागृहात अडथळा आणला होता. ते थकले आणि निघून गेले, अशी त्यांनी विरोधकांवर सभात्याग केल्यानं टीका केली.

राज्यसभेत पंतप्रधान मोदी म्हणाले, आज भारत अनेक राष्ट्रांचा एक विश्वासार्ह भागीदार आहे. आम्ही जगाच्या कल्याणासाठी आपली भूमिका बजावत आहोत. आज संपूर्ण जग ’ग्लोबल साउथ’बद्दल बोलते. परंतु त्या चर्चेतील मुख्य पात्र म्हणून, आज भारत जागतिक व्यासपीठांवर ’ग्लोबल साउथ’चा एक मजबूत आवाज म्हणून उदयाला आला आहे. विरोधी पक्षाच्या सदस्यांनी हुकूमशाही खपवून घेतली जाणार नाही अशा घोषणा देत सभागृहात अडथळा आणला.

विरोधी पक्षाचे सदस्य गोंधळ घालत असतानाही, पंतप्रधान मोदींनी आपलं भाषण सुरू ठेवलं. राज्यसभेतील विरोधी पक्षनेते तथा काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना टोला लगावत म्हणाले, खरगेजींचे वय पाहता, मी तुम्हाला, सभापतींना विनंती करतो की, त्यांना बसूनच घोषणाबाजी करू द्या. जेणेकरून त्यांना कोणताही त्रास होणार नाही. मागे तरुण लोक आहेत. त्यामुळे, कृपया खरगेंजींना बसूनच घोषणाबाजी करण्याची परवानगी द्या.



पुढे पंतप्रधान म्हणाले की, बहुतेक विकसित राष्ट्रे त्यांच्या समृद्ध संस्था आणि विकसित अर्थव्यवस्था असूनही वृद्ध होत आहेत. या उलट भारत तरुण आणि उत्साही आहे. ’युवा प्रतिभेनं’ परिपूर्ण आहे. त्यामधील स्वप्ने, महत्त्वाकांक्षा आणि क्षमता यशाच्या नव्या उंचीवर पोहोचण्यास मदत करू शकते. आज भारत जगाला आशा देत आहे. उपाययोजना देत आहे. यावर सत्ताधारी खासदार जोरदार टाळ्या आणि बाके वाजवून प्रतिसाद दिला.

पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले की, आज भारत हा जगातील संकटात असलेल्या अर्थव्यवस्थांना आशा देणाऱ्या प्रमुख अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. देशात कमी महागाई असून वेगानं प्रगती करत आहे. देश अकराव्या स्थानावरून जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेनं वाटचाल करत आहे. खेळापासून ते अंतराळापर्यंत आणि प्रत्येक क्षेत्रात भारत आत्मविश्वासानं पुढे जात आहे. युरोपियन युनियनसोबतच्या मुक्त व्यापार कराराचे कौतुक करताना, त्यांनी या कराराला सर्व करारांची माता म्हटलं. गेल्या काही वर्षांत केलेल्या सुधारणा आणि आमूलाग्र बदलाच्या पावलांमुळे जग आता भारतासोबत व्यवसाय करण्यास तयार आणि उत्सुक आहे, असे त्यांनी प्रतिपादन केले.

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे म्हणाले, आमचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना सभागृहात बोलू दिलं जात नाही. हे गेल्या ४ दिवसांपासून आम्ही पाहत आहोत. आम्हाला परराष्ट्र धोरण, ट्रम्प काय म्हणाले, सामाजिक न्याय, आणि देशातील बेरोजगारी व महागाई यासह अनेक विषयांवर प्रश्न विचारायचे होते. आमचे सर्व सदस्य हे मुद्दे एकेक करून मांडायला तयार होते.. आम्ही, सर्व विरोधी पक्षांच्या सदस्यांनी ठरवले होते की, जर त्यांनी विरोधी पक्षनेत्यांना बोलू दिले, तर आम्ही सभागृहाचे कामकाज चालू देऊ. चर्चेत भाग घेऊ. पण, त्यांनी विरोधी पक्षनेत्याला बोलू दिलं नाही

ते पुढे म्हणाले, जेव्हा पंतप्रधान आले, तेव्हा आम्ही त्यांनाही आवाहन केले. आम्ही नियमांनुसार करत होतो. कोणताही गोंधळ घालत नव्हतो. पण, त्यांनी लोकसभा किंवा राज्यसभा, दोन्ही सभागृहांमध्ये कोणत्याही विरोधी पक्षनेत्याला बोलू न देण्याचा निर्णय घेतला आहे. जेव्हा एखादा माणूस आपल्या देशासाठी प्राणार्पण केलेल्या महान नेत्यांविरुद्ध बोलतो, तेव्हा ते त्याला मायक्रोफोन देतात. तो त्याचा वापर करून मनमर्जीप्रमाणं शिवीगाळ करतो. मात्र, सरकार शांत राहते. त्यांनी कधी याचा निषेध केला आहे का? आम्ही याचा निषेध केला आहे. त्यामुळे सर्व पक्षनेत्यांनी निर्णय घेतला की, जर ते आम्हाला बोलू देणार नाहीत, तर आम्ही सभात्याग करून निषेध केला पाहिजे.

# राज्यातील १,१६४ शाळांत मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृह नाही, हजारो शाळा आजही अंधारात!

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील १,१६४ शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहाची सोय नसल्याचे आणि ३,३२८ शाळांमध्ये वीजही नसल्याचे भीषण वास्तव शिक्षण विभागाच्या सांख्यिकी अहवालातून उजेडात आले आहे.

मुंबई, गोंदिया, कोल्हापूर, सातारा आणि ठाणे जिल्ह्यांमध्ये मात्र मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहांची शंभर टक्के सुविधा आहे.

मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृह नसलेल्या शाळांमध्ये १,०४३ शासकीय, ६४ खासगी अनुदानित, २० खासगी विनाअनुदानित आणि ३७ सेल्फ फायनान्स शाळांचा समावेश आहे. वर्ष २०२४ ते २०२६ या दोन वर्षातील शिक्षण विभागाचा सांख्यिकी अहवाल २९ जानेवारीला शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांना सादर केला गेला. त्यातून शाळांमधील भीषण वास्तव अधोरेखीत झाले आहे.



मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृह नसलेल्या सर्वाधिक ११२ शाळा बीड जिल्ह्यात आहेत. हिंगोली, नांदेड, परभणी, गडचिरोली, जळगाव, अमरावती, नाशिक आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये ५० ते १०० शाळांमध्ये ही सुविधा नाही. तर २० जिल्ह्यांमध्ये ५० पेक्षा कमी शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृह नसल्याचे अहवालात म्हटले आहे.

वीज नसलेल्या ३,३२८ शाळांमध्ये ३,१०२ शासकीय, १३१ खासगी अनुदानित, १९ विनाअनुदानित आणि ७६ सेल्फ फायनान्स शाळांचा समावेश आहे. वीज नसलेल्या शाळांचा तपशील : नंदुरबार– ४५५, गडचिरोली– ४३१, बीड– ३८६, नांदेड– २२९, परभणी– २००, हिंगोली– १७४, धुळे –१६३, नाशिक– १६३, संभाजीनगर– १५७, लातूर– १३६, जालना– ११८.

आमच्या उच्चस्तरीय बैठकीत शाळांमधील सुविधांच्या कमतरतेबाबतचा अहवाल सादर झाला. येत्या एक महिन्यात संबंधित शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहांची व्यवस्था केली जाईल, असे शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंग देवोल यांनी म्हटले आहे.

**राज्यातील ’हँडवॉश’ सुविधा नसलेल्या शाळा**

राज्यातील २,४२८ शाळांमध्ये हँडवॉश दिले जात नाही. अशा शाळांमध्ये १,५८७ शासकीय, ४५८ खासगी अनुदानित, ५६ विनाअनुदानित आणि ३२७ सेल्फ फायनान्स शाळांचा समावेश आहे. यामुळे संताप व्यक्त व्यक्त करण्यात येत आहे.

**१९ शाळांमध्ये पाण्याचा अभाव**

पाण्याची सुविधा नसलेल्या राज्यातील शाळांची संख्या १९ आहे. धुळे, जळगाव, गोंदिया, गडचिरोली, बीड, सोलापूर, सांगली येथे अशी प्रत्येकी १ शाळा आहे. नांदेड– ५, पुणे– २, अहिल्यानगर– २, कोल्हापूर– ३.

# वनविभागाच्या विश्रामगृहात मांसाहाराची परवानगी द्या; राज्यमंत्र्यांच्या मागणीने खळबळ

गडचिरोली । प्रतिनिधी

मागील २२ वर्षांपासून वनविभागाच्या विश्रामगृहांमध्ये मांसाहार करण्याची राज्य शासनाने घातलेली बंदी उठविण्याची मागणी करुन राज्याचे अर्थ व कृषी राज्यमंत्री तथा गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री आशिष जयस्वाल यांनी खळबळ उडवून दिली आहे.

आशिष जयस्वाल यांनी अलीकडेच वनमंत्री गणेश नाईक यांना वनविभागाच्या विश्रामगृहात मांसाहार करण्यावर घातलेली बंदी उठवावी, अशी मागणी करणारे पत्र पाठविले आहे. आज जयस्वाल गडचिरोली येथे आले असता, यासंदर्भात पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर त्यांनी आपल्या मागणीचे समर्थन केले.

जयस्वाल म्हणाले की, महाराष्ट्र राज्याचे धोरण आणि इतर राज्याचे धोरण यात एकसूत्रता असणे आवश्यक आहे. आपल्या राज्यातील पर्यटक इतर राज्यात जातात, तेव्हा तेथे त्यांना ज्या सुविधा मिळतात; त्या महाराष्ट्रातही मिळायल्या हव्यात. इतर राज्यातील वनविभागाच्या विश्रामगृहांमध्ये मांसाहार करण्याची मुभा आहे. परंतु महाराष्ट्र राज्यात बंदी आहे. त्यामुळे आपल्या राज्यात येणारे पर्यटक खासगी हॉटेल्सना पसंती देतात. परिणामी अर्थव्यवस्थेला फटका बसतो. यासंदर्भात काही पर्यटकांनी आपणाकडे तक्रार केली होती. त्यामुळे आपण मांसाहाराची बंदी उठविण्याची मागणी केली असून, त्याबाबत वनमंत्र्यांशी चर्चा केल्याचे जयस्वाल यांनी सांगितले.

२००४-०५ मध्ये तत्कालिन वनमंत्री बबनराव पाचपुते यांनी धोरणात्मक निर्णय म्हणून वनविभागाच्या विश्रामगृहांमध्ये मांसाहार करण्याची बंदी घातली होती, हे येथे उल्लेखनीय. परंतु आता दुसऱ्या मंत्र्यांनीच ही बंदी उठविण्याची मागणी केल्याने हा मुद्दा ऐरणीवर आला आहे.

# गेस्ट हाऊसमध्ये मांसाहारावर बंदी कशासाठी? मांसाहार करणाऱ्या लोकांसाठी ही बंदी अन्यायकारक आहे–विजय वडेट्टीवार

**नागपूर । प्रतिनिधी**

वन विभागाच्या गेस्ट हाऊसमध्ये मांसाहार सुरू करा, असे निवेदन मंत्री आशिष जयस्वाल यांनी केले आहे. याबाबत विजय वडेट्टीवार यांना प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी प्रतिक्रिया दिली. जंगलात वन्य प्राणी मांसाहार करतातच. वाघ हरणाची शिकार करतो, कोल्हा कोंबडी किंवा बकरा खातो, बिबट्या गावातला कुत्रा उचलतो. ही निसर्गाची सायकल आहे. अशा ठिकाणी गेस्ट हाऊसमध्ये मांसाहारावर बंदी कशासाठी? मांसाहार करणाऱ्या लोकांसाठी ही बंदी अन्यायकारक आहे. असं वाटतं की महाराष्ट्रातील गेस्ट हाऊस महाराष्ट्रीयन माणसांसाठी नसून सुरत किंवा अहमदाबादहून आलेल्या लोकांसाठीच आहेत. त्यामुळेच या निर्णयाला विरोध होत आहे, असेही वडेट्टीवार म्हणाले.



मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवरील भीषण वाहतूक कोंडीवर त्यांनी सरकारच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. यालाच आपण विश्वगुरू म्हणायचं का? यालाच विकास म्हणायचा का? टँकर पलटल्यानंतर ३० ते ३६ तास वाहतूक ठप्प राहते आणि ती सोडवण्याची यंत्रणा आपल्याकडे नाही. चंद्रावर, मंगळावर जाण्याच्या गोष्टी करतो, पण एका अपघातानंतर रस्ता मोकळा करू शकत नाही. समृद्धी महामार्ग, शक्तिपीठ महामार्गाची भाषा करणाऱ्या सरकारची ही नाचक्की आहे. या सगळ्यावरून महाराष्ट्राची खरी प्रगती जनतेला समजते आहे, असा घणाघात विजय वडेट्टीवार यांनी केला.

# लाभापासून वंचित राहिलेल्या महिलांसाठी आनंदाची बातमी! खात्यात ४५०० रुपये जमा होणार, एकनाथ शिंदेची मोठी घोषणा

**मुंबई । प्रतिनिधी**

महायुती सरकारकडून महाराष्ट्रातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना' सुरु केली आहे. या योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील लाभार्थी महिलांना दरमहा १५०० रुपये दिले जात आहेत. अशातच आता या योजनेबाबत महत्त्वाची माहिती समोर आली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'लाडकी बहीण योजना'बाबत मोठी घोषणा केली आहे.

ई-केवायसी (श-घधउ) प्रक्रियेमुळे ज्या महिलांचे हप्ते रखडले होते, त्यांना दिलासा देणारी बातमी समोर आली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आता लाडक्या बहिणींच्या खात्यात ४,५०० रुपये जमा केले जाणार असल्याची घोषणा केली आहे. नोव्हेंबर, डिसेंबर आणि जानेवारी या तीन महिन्यांचे एकत्रित ४५०० रुपये पात्र महिलांच्या बँक खात्यात जमा केले जाणार असल्याची माहिती समोर आली आहे.



दरम्यान, महायुती सरकारने लाडकी बहीण योजनेसाठी ई-केवायसी (श-घधउ) प्रक्रिया करणे अनिवार्य केले होते. मात्र अद्यापही तांत्रिक कारणांमुळे किंवा ई-केवायसी प्रक्रियेअभावी अनेक महिलांचे हप्ते रखडले होते. अशा पात्र महिलांच्या बँक खात्यात आता ४५०० रुपये मिळणार असल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. ई-केवायसी करूनही योजनेचा लाभ मिळत नसल्याच्या तक्रारी महिलांकडून केल्या जात होत्या. या तक्रारींची दखल घेत महिला व बालविकास विभागाने पडताळणी मोहीम हाती घेतली आहे.

**अंगणवाडी सेविकांकडून पडताळणी**

लाडकी बहीण योजनेतील ज्या महिलांचे अर्ज पात्र असूनही लाभापासून वंचित असणाऱ्या महिलांच्या घरोघरी जाऊन अंगणवाडी कर्मचारी पडताळणी करणार आहेत. ई-केवायसी करूनही तांत्रिक अडचणीत अडकलेल्या सर्व महिलांच्या अर्जांची छाननी आणि पडताळणी पूर्ण होताच फेब्रुवारी महिन्यात हे पैसे जमा होण्यास सुरुवात होईल, अशी माहिती आहे.

त्याचबरोबर, सरकारने लाडकी बहीण योजनेची रक्कम वाढवून २१०० करण्याचीही घोषणा केली होती. याबाबत मंत्री हसन मुश्रीफ यांनी असे म्हटले की, अर्थ खात्याच्या जबाबदाऱ्या निश्चित झाल्यानंतर लाडकी बहीण योजनेचा हप्ता २१०० रुपये करण्यावर सरकार सकारात्मक आहे. त्यामुळे भविष्यात महिलांना १५०० ऐवजी २१०० रुपये मिळण्याची मोठी शक्यता आहे.

# ’त्या’ दिवशी मी अजित पवारांसोबत विमानाने जाणार होतो, पण...’, जानकराचा दावा

पुणे । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांचा विमान अपघातात मृत्यू झाला. बुधवार, दि. २८ जानेवारी रोजी बारामती विमानतळाजवळ त्यांचं विमान कोसळलं आणि विमानातल्या पाच जणांचा जीव गेला. या घटनेनंतर सबंध महाराष्ट्र शोकसागरात बुडाला आहे. एवढा दिग्गज नेता दगावल्याने अनेक स्तरातून संशय निर्माण केला जातोय. या अपघातामध्ये अजित पवार यांच्यासह त्यांचे सुरक्षा रक्षक विदीप जाधव, कॅप्टन सुमित कपूर, को-पायलट शांभवी पाठक आणि फ्लाईट अटेंडट पिंकी माळी यांचाही जीव गेला.

ज्या दिवशी अजित पवार विमानाने बारामतीला निघाले होते, त्याच दिवशी आणि त्यांच्याच विमानात राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष, माजी मंत्री महादेव जानकर हेदेखील बारामतीला जाणार होते. खुद्द जानकर यांनीच ही माहिती दिली आहे. ते म्हणाले, मी आणि अजितदादा एकत्र बारामतीला जाणार होतो. आमचं तसं बोलणं झालं होतं, मात्र मी मुंबईमध्ये उशिरा पोहोचल्याने त्यांच्यासोबत जाऊ शकलो नाही.

’’ज्या दिवशी अजित पवारांचा अपघात झाला त्याच्या अगोदरच्या दिवशी आमचा संवाद झाला होता. बारामतीला एकत्र जाण्याचं ठरलं होतं. मात्र मी मुंबईमध्ये उशिराने पोहोचलो.. बारामतीत त्यांच्या विमानाचा दुर्दैवी अपघात झाला आणि महाराष्ट्राची मोठी हानी झाली.’’’ असं जानकर म्हणाले.

राज्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका सुरु असल्याने अजित पवार हे प्रचारासाठी बारामतीला निघाले होते. मात्र काळाने घाला घातला आणि त्यांचं दुर्दैवी निधन झालं. डीजीसीएकडून या विमान अपघाताची चौकशी सुरु आहे. विमानाच्या ब्लॅक बॉक्समधीला डेटा रिकव्हर केला जातोय. तसेच सीआयडीकडूनही या प्रकरणाची स्वतंत्र तपास केला जाणार आहे. विमानामध्ये तंत्रिक बिघाड झाला होता, असं प्रथमदर्शनी तज्ज्ञ सांगत आहेत. संपूर्ण चौकशीनंतरच याबाबतची माहिती कळू शकेल.

# बीड पोलिसांची धडाकेबाज कारवाई: वर्षभरापासून फरार असलेला सराईत गुन्हेगार 'सय्यद अनवर' जेरबंद

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद कार्यालयासमोर शस्त्राचा धाक दाखवून लुटमार करणारा आणि गेल्या एक वर्षापासून पोलिसांना गुंगारा देऊन हैदराबाद येथे लपून बसलेला सराईत गुन्हेगार सय्यद अनवर याला पकडण्यात बीड शहर पोलिसांना मोठे यश आले आहे. पोलिसांनी केवळ आरोपीला अटकच केली नाही, तर त्याच्याकडून चोरीचा मुद्देमालही हस्तगत केला आहे.

१२ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी २ वाजेच्या सुमारास अशोक रोहिदास कांबळे (रा. साखरे बोरगाव, ह.मु. बीड) हे जिल्हा परिषद कार्यालयासमोर पत्र्याचे शेड मारण्याचे काम करत होते. यावेळी आरोपी सय्यद अनवर सय्यद मुजावर आणि यासिन खान पठाण या दोघांनी त्यांना गाठले. आरोपींनी हातात फरशी, कुऱ्हाड आणि तलवारीचा धाक दाखवून कांबळे यांना धमकावले. त्यानंतर कामासाठी लागणारे २५,००० रुपये किमतीचे वेल्डिंग मशीन, कटर मशीन आणि ड्रिल मशीन जबरदस्तीने चोरून नेले होते. याप्रकरणी बीड शहर पोलीस ठाण्यात 'भारतीय न्याय संहिता' कलम ३०९ (४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

**हैदराबादमधून पोलिसांना देत होता गुंगारा**

गुन्हा घडल्यापासून मुख्य आरोपी सय्यद अनवर हा हैदराबाद येथे फरार झाला होता. पोलीस त्याच्या मागावर होते, मात्र तो सतत ठिकाणे बदलून पोलिसांना चकवा देत होता. दरम्यान, हा सराईत गुन्हेगार बीडमध्ये आला असून जिल्हा परिषद परिसरात संशयास्पदरित्या फिरत असल्याची खात्रीशीर माहिती बीड शहर पोलिसांच्या पथकाला मिळाली.

मिळालेल्या माहितीची तत्काळ दखल घेत पोलिसांनी जिल्हा परिषद परिसरात सापळा रचला आणि अत्यंत शिताफीने सय्यद अनवरला ताब्यात घेतले. त्याच्याकडून गुन्ह्यातील चोरी गेलेले साहित्य जप्त करण्यात आले आहे. सय्यद अनवर हा अभिलेखावरील सराईत गुन्हेगार असल्याने, आता त्याला पोलिसांच्या कडक निगराणीखाली ठेवले जाणार आहे.

**गुन्हेगारांना पोलिसांचा इशारा**

पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या मार्गदर्शनाखाली बीड शहरात गुन्हेगारांविरुद्ध कडक मोहीम राबवली जात आहे. शहरात दहशत माजवण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अशा प्रकारचे गुन्हे केल्यास कोणाचीही गय केली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा पोलिसांनी दिला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पूजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली बीड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, पोलीस उपनिरीक्षक महेश जाधव, पोलीस हवालदार सय्यद शहेनशहा, गहिनीनाथ बावनकर, मंगेश शिंदे, राम पवार आणि इलियास शेख यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पूर्ण केली.

# स्व.अजित दादांच्या निधनामुळे शिवजयंती निमित्त आयोजित सांस्कृतिक कार्यक्रम रद्द

**शासकीय महापूजा, अभिवादन करून साधेपणाने साजरी होणार शिवजयंती**

बीड । प्रतिनिधी

राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री, दिवंगत लोकनेते स्व.अजित दादा पवार यांच्या आकस्मिक निधनामुळे बीड येथे बीड शहर सार्वजनिक शिवजयंती समितीच्या वतीने दरवर्षी साजरे होणारे कार्यक्रम रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.दरम्यान सकाळी ७:०० वा. होणाऱ्या शासकीय महापूजा आणि अभिवादन सभेस मोठ्या संख्येने शिवप्रेमी नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन बीडचे आ संदीप क्षीरसागर आणि सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती बीड शहर च्या वतीने करण्यात आले आहे.

गेल्या ३० वर्षांपासून बीड शहरात, सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती बीड शहराच्या आयोजनातून डीजेमुक्त आणि वर्गणी मुक्त असणारी शिवजयंती, सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून आदर्श पद्धतीने साजरी केली जाते. सालाबादप्रमाणे यंदाही जल्लोषात शिवजयंती साजरी करण्यासाठी शिवकालीन मर्दानी खेळ आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. परंतु काही दिवसांपूर्वीच दिवंगत लोकनेते स्व.अजित दादा पवार यांचे विमान अपघातात आकस्मिक आणि दुर्दैवी निधन झाले आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे. या दुःखद पार्श्वभूमीवर सामाजिक बांधिलकी आणि संवेदनशीलतेची जाणीव ठेवत, यावर्षी शिवजयंती कोणतेही जल्लोषी कार्यक्रम न करता साधेपणाने साजरी करण्याचा निर्णय समितीच्या वतीने घेण्यात आला आहे.

परंपरेप्रमाणे सकाळी ७:०० वा. जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती बीड शहरचे अध्यक्ष, सचिव आणि पदाधिकारी तसेच विविध मान्यवर यांच्या हस्ते शासकीय महापूजा आणि अभिवादन करून साधेपणाने शिवजयंती साजरी केली जाणार आहे. शासकीय महापूजा आणि अभिवादन कार्यक्रमासाठी दि.१९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७:०० वा. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहा. असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर आणि सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती बीड शहर यांच्याकडून करण्यात आले आहे.

# श्री क्षेत्र मच्छिन्द्रनाथ गड येथे गर्दीचा फायदा घेऊन भाविकांच्या गळ्यातील चैन चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

आष्टी । प्रतिनिधी

मायंबा गड येथे भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असताना या संधीचा गैरफायदा घेऊन भाविकांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने चोरी करणाऱ्या टोळीविरोधात अंभोरा पोलिसांनी प्रभावी कारवाई केली आहे.

सदर ठिकाणी अमावस्येनिमित्त मोठी यात्रा भरत असून चोरीचे प्रकार घडल्याने अंभोरा पोलीस स्टेशन येथे चोरीचे गुन्हे दाखल झाले होते. दाखल गुन्ह्यांच्या अनुषंगाने तात्काळ तपास सुरू करून तांत्रिक विश्लेषण, उउढत फुटेज, गुप्त बातमीदार व प्रत्यक्ष तपासाच्या आधारे एका संशयित व्यक्तीला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत आरोपी सुधीर रावसाहेब कराळे रा. धामणगाव देवीचे तालुका पाथर्डी, जि.अहिल्यानगर याने चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली असून त्याच्याकडून चोरीस गेलेली सोन्याची ०२ तोळ्याची चैन जप्त करण्यात आली आहे. सदर टोळीतील इतर फरार आरोपींची ओळख पटविण्यात आली असून त्यांचा शोध व अटक करण्यासाठी विशेष पथकाद्वारे तपास सुरू आहे.

अंभोरा पोलिसांकडून यात्रास्थळी व गर्दीच्या ठिकाणी चोरी, फसवणूक व इतर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी सातत्याने कडक नजर ठेवण्यात येत असून नागरिकांनी देखील आपले मौल्यवान दागिने व साहित्य सुरक्षित ठेवण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

सदरची कामगिरी बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री नवनीत कावंत सर, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर सर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री बाळकृष्ण हनपुडे पाटील सर यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि मंगेश साळवे, पोउपनि आदिनाथ भडके, पोह/हरिभाऊ बांगर, मुकुंद एकशिंगे,राजेंद्र वायकर, पोशि/ कृष्णा नरवडे, जयराम उभे, अमोल शिरसाठ, स्थागुशाचे अंमलदार अशोक दुबाले व सोमनाथ गायकवाड यांनी पार पाडली आहे.

# १० वी व १२ वी च्या परिक्षा, जयंती उत्सव; जिल्ह्यामध्ये मनाई हुकूम जारी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हयात कायदा व सुव्यवस्थेबाबत आगामी १० वी व १२ वी च्या परिक्षा होणार असून महाशिवरात्री, छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव साजरे होणार असून विविध राजकीय पक्ष संघटनेच्या वतीने त्याच्यां न्याय मागण्यासाठी प्रकारचे निदर्शने, अंदोलने, उपोषण,मोर्चे इत्यादी होण्याची शक्यता आहे. यामूळे अचानक घडणा-या घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्याअनुषंगाने कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे.

दिनांक ५ फेब्रुवारी २०२६ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था आबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.

शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे.

या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपणास्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये.

जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही.

कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय १५ दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.

# माजी सैनिकांच्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी 'बाईक रॅली' ; तहसीलदार शेळके यांच्याकडून जवानांचे स्वागत

बीड । प्रतिनिधी

देशाच्या सीमेवर अहोरात्र पहारा देणाऱ्या माजी सैनिकांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी आणि त्यांच्या समस्यांना थेट वाट करून देण्यासाठी इंडियन आर्मी 'बॉम्बे इंजिनीअर ग्रुप' (खडकी) च्या सेवानिवृत्त जवानांनी महाराष्ट्रभर बाईक रॅलीचे आयोजन केले आहे. ही रॅली बुधवारी बीडमध्ये दाखल झाली असता, प्रशासनाच्या वतीने तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी जवानांचे उत्स्फूर्त स्वागत केले.



पुणे ते बीड असा प्रवास सेवानिवृत्त जवानांच्या या रॅलीने महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांचा प्रवास केला आहे. पुणे येथून सुरू झालेली ही रॅली सातारा, कोल्हापूर, सांगली, धाराशिव आणि लातूर या जिल्ह्यांतून प्रवास करत ४ फेब्रुवारी रोजी बीड जिल्ह्यात पोहोचली. या प्रवासादरम्यान रॅलीच्या माध्यमातून ठिकठिकाणच्या माजी सैनिकांच्या समस्या जाणून घेतल्या जात आहेत.

प्रशासनाकडून मदतीची ग्वाही बीडमध्ये रॅलीचे आगमन झाल्यानंतर तहसीलदार चंद्रकांत शेळके आणि माजी सैनिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी जवानांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी माजी सैनिकांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने पेन्शनचे प्रलंबित प्रश्न, पुनर्वसनाच्या योजना , शासकीय कामकाजातील अडचणी या प्रश्नांवर चर्चा करताना तहसीलदार शेळके यांनी जवानांच्या अडचणी प्राधान्याने सोडवण्याचे आश्वासन दिले. माजी सैनिकांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रशासन सदैव सकारात्मक राहील आणि त्यांच्या अडचणींना वाचा फोडण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

सैनिकांच्या प्रश्नांना मिळणार आवाज माजी सैनिकांच्या न्याय्य हक्कासाठी काढण्यात आलेली ही रॅली राज्यात चर्चेचा विषय ठरत आहे. सैनिकांच्या समस्या थेट प्रशासनापर्यंत पोहोचवण्यासाठी ही रॅली एक प्रभावी माध्यम ठरली असून, यामुळे सेवानिवृत्त जवानांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# महाशिवरात्री व संताजी महाराज पुण्यतिथी महोत्सवानिमित्त संगीत शिवमहापुराण कथा

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील ग्रामदैवत असलेल्या श्री भामेश्वर मंदिरात महाशिवरात्री महोत्सव व राष्ट्रसंत संताजी जगनाडे महाराज पुण्यतिथी महोत्सवानिमित्त दि. ८ फेब्रुवारी ते १६ फेब्रुवारी दरम्यान संगीत शिव महापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे.



श्री भामेश्वर मंदिर येथे गेल्या तीन दशकांपासून महाशिवरात्री महोत्सवाचे आयोजन केले जाते प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही महाशिवरात्री व राष्ट्रसंत संताजी जगनाडे महाराज पुण्यतिथी अशा संयुक्त महोत्सवाचे निमित्त प्रसिद्ध कथाकार ह.भ.प. भक्तीदिदी पांचाळ (आळंदी) यांच्या रसाळ वाणीतून संगीत शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यांना संगीतसाथ ह.भ. प. सुरेश महाराज पांचाळ ह. भ. प. प्रतिक महाराज विद्यालय पांचाळ ह. भ. प. संगीताताई सोळसकर ह.भ.प.राजू महाराज शिंदे व ह. भ. प. आनंद महाराज गाडे करणार आहेत. ह. भ. प. भक्तीदिदी पांचाळ यांच्या रसाळ वाणीतून दररोज रात्री ७ ते १० यावेळेत कथा होणार आहे.

संगीत शिवमहापुराण कथा दि.८ ते १४ फेब्रुवारी पर्यंत होणार असून दि. १५ फेब्रुवारी रोजी रात्री शिव महाशिवरात्री निमित्त १० ते १२ ह. भ. प. राधाताई महाराज (संत मिराबाई संस्थान महासांगवी) यांचे कीर्तन होणार आहे. तर दि. १६ रोजी सकाळी ८ ते ११ शिवप्रतिमा व राष्ट्रसंत संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेची छत्रपती शिवाजी महाराज चौकातून शोभायात्रा निघणार आहे. यानंतर सकाळी ११ ते १ ह. भ. प. सतिश महाराज उरणकर (श्री विठ्ठल रुक्मिणी संस्थान पाटोदा) यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. त्यानंतर कै. पोपट शिंदे यांचे स्मरणार्थ शिंदे परिवारातर्फे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या शिवमहापुराण कथा, कीर्तन व महाप्रसादाचा पंचक्रोशीतील भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन भामेश्वर मित्र मंडळ व संताजी युवक मंडळ कडून करण्यात आले आहे.

# लिंबागणेश तंटामुक्ती समितीच्या अध्यक्षपदी बिनविरोध डॉ. गणेश ढवळे यांची निवड

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात आज गुरुवार, दिनांक ०५ रोजी सर्वसाधारण ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. या ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी सरपंच बालासाहेब जाधव होते. ग्रामविकास अधिकारी श्रीराम वीर यांनी सभेत विविध विषयांचे सविस्तर वाचन करून ग्रामस्थांना माहिती दिली.

या ग्रामसभेत महात्मा गांधी तंटामुक्त गाव अभियान अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या तंटामुक्ती समितीच्या अध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. सरपंच बालासाहेब जाधव यांनी डॉ. गणेश ढवळे यांच्या नावाची अधिकृत शिफारस केली, तर सेवा सोसायटीचे चेअरमन रविंद्र निर्मळ यांनी त्यास अनुमोदन दिले. ग्रामस्थांनी एकमुखाने त्यांच्या नावाला पाठिंबा दिला.



निवडीनंतर सरपंच, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांच्या वतीने डॉ. गणेश ढवळे यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यांच्या सामाजिक कार्याचा गौरव करत गावातील विविध प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी यापूर्वी दिलेल्या योगदानाचे विशेष कौतुक करण्यात आले.

यावेळी पत्रकार हरिओम क्षीरसागर यांनी, गावातील शांतता, सलोखा आणि सौहार्द वाढविण्यासाठी डॉ. गणेश ढवळे यांचे नेतृत्व महत्त्वपूर्ण ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

या कार्यक्रमास जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक दिपक घाटे, शंकर वाणी, ॲड. गणेश वाणी, ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ, दामोदर थोरात, रमेश गायकवाड, महादेव कुदळे, अक्षय वाणी, बाळकृष्ण थोरात, सुरेश निर्मळ, दादा गायकवाड, मोहन कोटुळे, केशव गिरे, जीवन मुळे, सुखदेव वाणी, प्राथमिक आरोग्य केंद्र आरोग्य सहाय्यक अशोक लोखंडे,विष्णु गर्जे, आसराजी वीर,अंगणवाडी सेविका बबिता निर्मळ, यमुना आबदार, प्रतिक्षा शिंदे, यांच्यासह अनेक मान्यवर, ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कांद्याचा वांदा! शेतकऱ्याने चक्क कांद्यावर फिरवला रोटावेटर; कांद्याला भाव नसल्यानं शेतकरी हवालदिल

**बीड । प्रतिनिधी**

कांद्याला भाव नाही, केलेला खर्चही निघेना, यामुळे बीडच्या जैताळवाडी गावातील शेतकरी भास्कर केसकर यांनी २ एकर कांद्याच्या पिकावर रोटावेटर फिरवलाय. ढगाळ वातावरणामुळे अगोदरच कांद्यावर अनेक कीड आणि रोग आले होते. यात लागवड आणि फवारणीसाठी लागलेल्या खताचा खर्चही निघत नाही. पुन्हा काढणीचा खर्च नको म्हणून उभ्या कांद्याच्या पिकावर शेतकऱ्याने ट्रॅक्टर फिरवलाय. एक एकर कांदा लागवड केली, त्याला ५० ते ७० हजार रुपये खर्च झालाय. मात्र उत्पन्न काहीच निघत नसल्याने आता आम्ही अडचणीत सापडला आहोत. जर कांद्याला भाव द्यायचा नसेल तर आम्हाला गांजा लागवडीची परवानगी द्या ही आमची मागणी आहे.

**सरकार शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करतंय**

सध्या कांद्याला १० ते ११ रुपये किलो भाव मिळत आहे. आम्हाला कमीत कमी ३० रुपये किलोप्रमाणे तरी भाव हवा आहे, तेव्हा कुठेतरी आमचा झालेला खर्च तरी निघेल, सरकार शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करीत आहे. खताचे भाव गगनाला भिडले आहेत, औषधाचे भावही गगनाला भिडले आहेत. सरकार मात्र याकडे लक्ष द्यायला तयार नाही हे सरकार शेतकऱ्याचं नाही. शेतकऱ्याला दोन्ही बाजूने मारायचं हे सरकार अडाणी अंबानीचं आहे, त्यांचं कर्ज माफ करतंय. आम्ही आत्महत्या करण्याजोगी परिस्थिती निर्माण झालीय, या खर्चाच्या तुलनेत कमीत कमी ३० रुपये किलो तरी भाव आम्हाला हवा आहे. आम्हाला नोकरीत संधी द्या, आम्हाला गांजा लागवडीसाठी परवानगी द्या, असंही शेतकरी म्हणतायत.



कांदा लागवडीसाठी प्रति एकरी ६० ते ७० हजार रुपये खर्च- मी पाच एकर क्षेत्रावर कांदा लागवड केलीय, मात्र या कांदा लागवडीसाठी प्रति एकरी ६० ते ७० हजार रुपये खर्च होतो. मात्र उत्पन्न काहीच निघत नाही, सरकार नुसतं आश्वासन देते. मात्र शेतकऱ्यांना कुठलीही सवलत नाही. खताचे भाव गगनाला भिडलेले आहेत. औषधाचे भावदेखील गगनाला भिडलेले आहेत. १० वर्षांपूर्वी युरियाचं खताचं पोतं १५० रुपयाला होते, मात्र आता तेच ६०० रुपयाला झालंय आणि इतरही खताचे आणि औषधाचे बियाणाचे भाव वाढलेत, मात्र शेतकऱ्यांच्या मालाला भावच नाही. आमच्या कांद्याला कमीत कमी ३० रुपये किलोप्रमाणे भाव लागला पाहिजे, असंही शेतकरी सांगतात.

**कांद्याला भाव नसल्यामुळे आम्ही अडचणीत**

मी कांदा लागवड केलेली आहे. मात्र कांद्यासाठी खर्च भरपूर झाला, आता कांद्याला भाव नसल्यामुळे आम्ही अडचणी सापडलोय. सरकारने कांद्यावरील बंदी उठवावी ही आमची मागणी आहे आणि कांद्याला योग्य दर द्यावा. शेतकरी अडचणीत सापडलाय, त्यामुळे सरकारने आम्हाला मदत करावी ही आमची मागणी आहे, असंही तरुण शेतकरी म्हणालेत.

हे पत्रक, मुद्रक व प्रकाशक विलास दिगंबरराव डोळसे यांनी विश्वकर्मा ऑफसेट प्रिंटर्स, पाटोदा (४१४२०४) जि.बीड येथे छापून सायं. दै. पाटोदा संचार कार्यालय, बसस्टॅण्डसमोर पाटोदा जि. बीड येथे प्रसिध्द केले. (संपादक– विलास डोळसे) मोबा.९४२३४७१८३३ (बीड न्याय कक्षेत)

PATODA SANCHAR Newspaper is published By Vilas Digambarrao Dolse,in front of Bus Stand, Patoda Dist. Beed, on behalf Vilas Digambarrao Dolse. edited by Vilas Digambarrao Dolse and printed by Vilas Digambarrao Dolse, Vishwakarma Offset Printers, Patoda (414204), Dist. Beed. (Beed Justice)

# संचार

**जाहिर प्रगटन, कोर्टाची जाहिर नोटीस, जन्म-मृत्युची नोंद, निविदा सुचना, ई टेंडर, नावात बदल, वाढदिवस शुभेच्छा जाहिरात तसेच इतर जाहिराती व बातम्या प्रसिध्दीसाठी संपर्क करा**

**९४२३४७१८३३**
**७०२०६४२६९३**




**दै. संचार च्या अंकाची पीडीएफ आपल्या मोबाईलवर मिळविण्यासाठी ९४२३४७१८३३ या मोबाईल नंबरवर मेसेज करा किंवा क्यूआर कोड स्कॅन करा**